संसारातील सर्व शक्तिशाली वस्तू ही विचारशक्ती आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २८ मार्च २०२५ | अंक १०७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# धनंजय मुंडेंना हत्या प्रकरणातील आरोपी करा

## माझ्या नादी लागू नका सोडणार नाही,मनोज जरांगे पाटील

### हा पैसा धनंजय मुंडेंना दिला जायचा.

**सत्य कधीच झाकत नाही, तुम्ही किती प्रयत्न केले तरी नियतीला मान्य नसते. त्या लोकांनी कोणासाठी केले तर ते धनंजय मुंडे यांच्यासाठीच. धनंजय मुंडे यांची ही संघटित गुन्हेगारी आहे, कुठे खंडण्या वसूल करायच्या, हा पैसा धनंजय मुंडेंना दिला जायचा. हत्याप्रकरणातील एक नंबरचा आरोपी टोळी तयार करून अशी कृती करत होता. एक नंबरच्या आरोपीनेच खंडणीसाठी खून करायला लावल्याचे सिद्ध झाले. धनंजय मुंडेनेच मोर्चे काढायला लावले, रस्ता रोको आंदोलन करायला लावले. माझा संबंध नसताना माझ्या फोटोला धनंजय मुंडेनीच चपला हाणायला लावला. तुम्ही असे कितीही कृती केले तरी नियतीला मान्य नसते. तुम्हाला याचे फळ मिळाले, माझ्या नादी लागू नका, इथून पुढे माझ्या नादी लागल्यास मी सोडणार नाही, अशा शब्दात जरांगेंनी थेट आमदार धनंजय मुंडेंना इशारा दिला आहे. दरम्यान, सरकारने धनंजय मुंडे यांना वाचवण्याचा प्रयत्न केला, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना वाचवायला नको होते. धनंजय मुंडे यांच्या कार्यालयात ही बैठक झाली, त्यामुळे ३०२ मध्ये धनंजय मुंडे आरोपी होतात आणि झालेच पाहिजे. गृहमंत्र्यांनी ते करावे, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली.**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सुनावणीला सुरुवात झाली असून या प्रकरणातील दुसरी सुनावणी कोर्टात पार पडली. यावेळी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी या प्रकरणात सुरुवातपासून नेमके काय घडले आणि कोणत्या आरोपीचा काय रोल आहे, याची माहिती कोर्टासमोर मांडली. तसेच दुसरीकडे या प्रकरणातील मुख्य आरोपीपैकी एक असलेल्या सुदर्शन घुले याच्यासह जयराम चाटे आणि महेश केदार या तिघांनी पोलिसांकडे हत्येची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठीच्या आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा इशारा दिला आहे. आता हे प्रकरण आरोप निश्चितीसाठी तयार असल्याचे उज्ज्वल निकम म्हणाले. मात्र कागदपत्रे न मिळाल्याने आरोप निश्चित करण्यात येऊ नये, अशी विनंती आरोपींच्या वकिलांनी केली आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी १० एप्रिल रोजी होणार आहे. दुसरीकडे, पवनचक्की कंपनीकडे खंडणी मागण्यात संतोष देशमुख हे मुख्य अडथळा होते. तसेच प्रतिक घुलेच्या वाढदिवशीच त्यांनी आणि मस्साजोग गावातील ग्रामस्थांनी पवनचक्की कंपनीच्या बाहेर आम्हाला मारहाण केली. त्याचे व्हिडिओ व्हायरल केल्याने आम्ही हे पाऊल उचलले, अशी कबुली सुदर्शन घुले याने दिल्याची माहिती आहे. देशमुख यांच्या हत्येआधी हॉटेल तिरंगा इथे विष्णू चाटेसोबत बैठक घेतल्याचेही घुलेने कबूल केले.

## अबब...! बीड तालुक्यात २० कोटी रुपयाचा भ्रष्टाचार

बीड। प्रतिनिधी जिल्ह्यात गुन्हेगारी सोबत भ्रष्टाचार पण खूप मोठ्या प्रमाणात बोकाळला आहे याकडे वरिष्ठ अधिकाऱ्याचे दुर्लक्ष होत आहे. भूसंपादन कायदा १८९४ अंतर्गत सात्रापोत्रा साठवण तलावासाठी जमीन संपादन करण्यात आली होती त्यामधे बीड तालुक्यातील मौजे १) पोत्रा, २) कुंभारी, ३) अंबीलवडगांव ४) मुर्शदपुर येथील जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. संपादित केलेल्या जमिनीच्या भूसंपादनामध्ये शेतकऱ्यांना ८०% आगाऊ रक्कम वाटप करण्यात आलेली आहे. अंतिम निवाडा २०%चा होणे अपेक्षित होते पण अंतिम निवाडा १००% करून शासनाची दिशाभूल करण्यात आली आहे. संचिका क्र.३४/२००४ सात्रा पोत्रा साठवण तलावाचे मूळ निवाड्याचे मा.उच्च न्यायालय खंडपीठ,औरंगाबाद यांचे आदेशाने १)०७/२००९, २)०९/२००९, ३) १०/२००९ अश्या प्रकारे वेगवेगळ्या संचिका करून भूसंपादन कायदा- २०१३ प्रमाणे दुसरे निवाडे तयार करून मावेजा वितरित करण्यात आलेला आहे. थोडक्यात या प्रकरणात भूसंपादन कायदा -१८९४ आणि भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे दुबार मावेजाचा लाभ घेतला

## विधीमंडळ उपविधान समितीच्या प्रमुखपदी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : विधीमंडळ उपविधान समितीच्या प्रमुखपदी कंधार-लोहा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची नियुक्ती विधानसभेच्या अध्यक्षांनी केली आहे. या समितीमध्ये १४ आमदार सदस्यांचा समावेश आहे. तीन टर्मचे आमदार असतानाही चिखलीकर यांची पहिल्यांदाच समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. गेल्या दोन टर्ममध्ये आमदार असताना चिखलीकर यांची कोणत्याही समितीच्या प्रमुखपदी वर्णी लागली नव्हती. लोकलेखा समितीच्या सदस्यापदी नियुक्ती झालेली होती. पहिल्यांदाच महत्वाच्या विधीमंडळ उपविधान समितीच्या अध्यक्षपदी प्रतापराव पाटील चिखलीकर यांची निवड झाली आहे. या समितीच्या प्रमुखपदाशिवाय आमदार वेतन व भत्ते समितीच्या सदस्यपदी त्यांची नियुक्ती झाली आहे. या समितीच्या प्रमुखपदी ना.अजित पवार यांची



नियुक्ती करण्यात आली आहे. उपविधान समितीच्या प्रमुखपदी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर तर सदस्यपदी आ.रविशेठ पाटील, आ.सुधीर गाडगीळ, आ. संजय पुराम, आ. किशोर जोरगेवार, आ. जितेश अंतापुरकर, आ.राघवेंद्र पाटील, आ.श्रीमती अनुराधा चव्हाण, राजेंद्र गावित, आ. दिलीप लांडे, आ. राजेंद्र पाटील यड्रावकर, आ. चंद्रकांत नवघरे, आ. सिध्दार्थ खरात, आ. अस्लम शेख या १४ सदस्यांचा समावेश आहे. समिती प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल आ. चिखलीकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


## साळेगाव येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उभारला पूर्णाकृती पुतळा

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील साळेगाव येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यात आला आहे. केज तालुक्यातील साळेगाव हे गाव केज तालुक्यातील अत्यंत महत्वाचे आणि प्रतिष्ठेचे समजले जाणारे गाव आहे. दलीत चळवळीत येथील कार्यकर्त्यांचे मोठे योगदान आहे. दि. २६ मार्च रोजी पहाटे ३:०० वा. च्या सुमारास साळेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृहा समोर भरलेल्या चबुत-



यावर भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार विश्व रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजी करीत आणि फटाक्यांची आतिषबाजी करीत प्रचंड जल्लोषात पुतळा बसविण्यात आला. सदर पुतळा हा सोनेरी रंगाचा असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वकिलांच्या वेशातील अत्यंत सुबक आणि देखणा पुतळा आहे. दिवसभर आंबेडकर प्रेमींची दर्शनासाठी गर्दी झालेली होती. तर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला आहे.

## कै.सारजाबाई गुलाबराव जाधव यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : लोहा तालुक्यातील सुगाव येथील ज्येष्ठ महिला नागरिक कै.सारजाबाई गुलाबराव पाटील जाधव वय वर्षे ८४ यांचे वृद्धापकाळाने दि.२७-मार्च रोजी पहाटे ५ वाजता निधन झाले असून.त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ४ वाजता सुगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. कै.सारजाबाई गुलाबराव जाधव त्यांच्या पश्चात चार मुले एक मुलगी नातू पणतू असा मोठा परिवार आहे.सुगाव येथील प्रतिष्ठित नागरिक अंबादासराव जाधव,भागवत जाधव,गुणवंत जाधव,विश्वास जाधव यांच्या मातोश्री तर राष्ट्रमाता गुरुकुल माध्यमिक विद्यालय हडसणी येथील सहशिक्षक गणेश अंबादास जाधव यांच्या त्या आजी होत.

## श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल किल्ले धारूरची यशाची परंपरा



बीड । प्रतिनिधी जवाहर नवोदय विद्यालय अंतर्गत दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या प्रवेश पूर्व परीक्षेचा निकाल दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी जाहीर झाला असून, या परीक्षेत श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल या नामांकित शाळेची यशाची परंपरा कायम राहिली आहे. दरवर्षी या शाळेतील विद्यार्थी नवोदय विद्यालय साठी पात्र होतात. त्याचप्रमाणे यावर्षीही पहिल्या यादीमध्ये शाळेतील विद्यार्थिनी कु. रचना माधव पंतोजी हिने यश संपादन केले तिच्या या मेहनती बद्दल शाळेच्या वतीने गुण गौरव करण्यात आला.



# प्रयागराजला खोक्या सापडतो, पण कृष्णा आंधळे, बजरंग सोनवणेचा पोलिसांवर निशाणा

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची क्रूर हत्या होऊन चार महिने लोटले. याप्रकरणातील तीन आरोपींनी त्यांचे अपहरण आणि खून केल्याची कबुली दिली. सुदर्शन घुले, जयराम चाटे आणि महेश केदार यांनी कोठडीत हा कबुलीजबाब दिला. पण याप्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे अद्यापही फरार आहे. गेल्या चार महिन्यांपासून तो यंत्रणेला गुंगारा देण्यात यशस्वी झाला आहे. त्यावरून खासदार बजरंग सोनवणे यांनी बीड पोलिसांवर चांगलेच तोंडसुख घेतले आहे. देर है लेकीन अंधेर नही हे प्रकरण जेंव्हा घडलं तेंव्हाच मी सांगितलं होतं की संतोष देशमुख हत्येमागे कट आहे. खंडणी मागितल्यावर केज मध्ये वाल्मिकी कराड सीसीटीव्हीत दिसले होते. कबुली जबाबात आरोपींनी सांगितलं की मारले आहे.

पोलिसांसमोर ही कबुली येण्यासाठी आज १०५ दिवस लागले. देर है लेकीन अंधेर नही, अशी प्रतिक्रिया बजरंग बाप्पा यांनी दिली. वाल्मिक दोन पत्नींना पैसे देत होता. खोक्याचं घर पाडलं गेलं.

## वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून हत्याकांड

आज फक्त जवाब समोर आला आहे. वाल्मिकच्या सांगण्यावरून मारलं आहे. सुदर्शन घुले हा म्होरक्या आहे. जो पर्यंत सर्व गुन्हेगार पकडले जात नाही तो पर्यंत आम्ही सोडणार नाही. तपास यंत्रणा आणि कायद्यावर विश्वास ठेवला पाहीजे. वाल्मिक कराड पैसे गोळा करत होता. तो पैसे कोणा कोणाला देत होता ते तपासायला पाहीजे. त्याची २ हजार कोटींची संपत्ती आहे. स्वतः च्या अकाऊटवरून पैसे जात होते. त्यात काही नेते अधिकारी पण होते. त्या सर्वांना शिक्षा झाली पाहिजे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २८ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### खाचखळग्यांची वाट...!

निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्र आणि आधार जोडणी सुधारणांच्या दिशेने पाऊल उचललं आहे. मात्र, तांत्रिक आणि व्यावहारिक अडचणींमुळे याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया मोठ्या अवघड आहे. मतदार नावे दुरुस्ती, बनावट मतदान रोखण्यासाठी हि उपयुक्त असली तरी गोपनीयता, नागरिकता सिद्धता या मुद्द्यांवर हा विरोध होत आहे. मतदार ओळखपत्र आणि आधार यांची जोडणी करण्याबाबत निवडणूक आयोगाने केलेले सूतोवाच, हे मतदान प्रक्रियेतील सुधारणांच्या दिशेने टाकलेले एक पाऊल म्हणावे लागेल; मात्र वेगवेगळ्या तांत्रिक, व्यावहारिक आणि घटनात्मक अडचणींमधून पार होऊन ते प्रत्यक्ष लागू करण्याचा पल्ला अतिशय दूरवरचा आहे. मतदान प्रक्रियेमध्ये अनेक त्रुटी असल्याचे प्रत्येक निवडणुकीनंतर समोर येते. देशभरात मतदार याद्यांमध्ये प्रचंड घोळ आहेत. महाराष्ट्र त नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदारांची संख्या आश्चर्यकारक पद्धतीने वाढल्याचा आरोप काँग्रेसने केला; तसेच पश्चिम बंगालमध्ये मतदार ओळखपत्रांतील गोंधळही समोर आले आहेत. आधार कार्डाची बायोमेट्रिक रचना पाहता अशा अडचणी दूर करण्यासाठी आधार आणि मतदार ओळखपत्रांची जोडणी, हा एक उपाय ठरू शकतो. ही जोडणी प्रत्यक्षात आली, तर मतदारांची नेमकी ओळख पटवणे आणि त्यायोगे बनावट मतदानास आळा घालणे शक्य होणार आहे. त्याबरोबरच मतदार याद्यांमधील दुबार नावे शोधून वगळणे त्यातून शक्य होईल; तसेच नाव पत्ता अशा तपशीलांत दुरुस्ती करणे किंवा नवी मतदार नोंदणी अशी कामे मतदारांसाठी सुलभ होऊ शकतील. गेल्या काही काळात नागरिकांच्या खिशात आधार-पॅन मतदार ओळखपत्रे अशा नवनव्या कार्डांची भरच पडत आहे, त्याऐवजी सर्वांची जोडणी करून एकच बहुउपयोगी कार्ड असावे, असाही एक विचार असून त्या दिशेने ही वाटचाल आहे. या जोडणीचे काही फायदे असून सरकार आणि निवडणूक आयोगही त्यासाठी आग्रही असले, तरी या मार्गात अनेक घटनात्मक आणि व्यावहारिक अडचणींची मालिका उभी आहे. यापूर्वीचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय पाहता निवडणूक आयोगही ङ्गही जोडणी ऐच्छिक असून, त्यातून मतदान किंवा मतदार नोंदणीचा हक्क नाकारता येणार नाही,फ असे सांगून जपूनच पावले टाकत असल्याचे दिसते. सन २०१५मध्ये अशीच आधार व मतदार ओळखपत्र जोडण्याचा ङ्गराष्ट्रीय मतदारयादी शुद्धीकरण आणि ओळख पटविण्याचा कार्यक्रमम हाती घेण्यात आला, त्यात काही लाख कार्डांची जोडणीही झाली. मात्र, दुसरीकडे ङ्गआधारची फक्त कल्याणकारी योजना व पॅनकार्ड जोडणीपुरतीच सक्ती करता येईल,फ असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने तो बारगळला. या जोडणीबाबत विरोधक आणि अभ्यासकांचे काही गंभीर आक्षेप आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने आधार कार्डाशी पॅन-बँक खाती असा तपशील जोडलेला असल्याने नव्या जोडणीतून गोपनीयतेच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन होण्याची भीती व्यक्त होते. सध्या ही जोडणी ऐच्छिक असली, तरी यंत्रणांकडून त्याची सक्ती होऊ शकते, अशीही चिंता आहे. आधार हा नागरिकत्त्वाचा पुरावा नसून ते केवळ ओळख पटवणारे कागदपत्र आहे, तर मतदान हा भारतीय नागरिकास दिलेला घटनादत्त अधिकार असल्याने आधारच्या आधारे तो कसा नाकारणार, हा प्रश्न आहे. उलटपक्षी भारतीय नागरिक नसलेल्या अनेकांनी आधारकार्डे मिळविली आहेत, त्यांनी याआधारे मतदान केले तर काय, या विरोधकांच्या प्रश्नातही तथ्य आहे; तसेच सरकारी यंत्रणेकडे आधारद्वारे जमा झालेल्या माहितीची चोरी आणि गैरवापराचीही भीती आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील आधार कार्ड नसलेल्या नागरिकांचे काय, हादेखील प्रश्न आहे. या जोडणीची तरतूद असलेले विधेयक चिकित्सा समितीकडे पाठविण्याची विरोधकांची मागणी डावलून कोणत्याही चर्चेविना २० मिनिटांत मंजूर झाले होते. या तरतुदींबाबतच्या वादांची धूळ अजूनही खाली बसलेली नाही. यापूर्वी तेलंगणमधील निवडणुकीत या जोडणीच्या सॉफ्टवेअरमुळे लाखो मतदारांची नावे यादीतून गायब झाल्याचे तेथील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी म्हटले होते, अशा तांत्रिक अडचणी दूर करणे, हेसुद्धा मोठे आव्हान आहे. अशा मोहिमांबाबत नोकरशाहीचे आजवरचे अनुभव फारसे सुखावह नाहीत. यापूर्वी आधार-पॅन जोडणी, गॅस सिलिंडर, बँक खातेक्रमांक जोडणीपासून ते सध्या वाहनांच्या सुरक्षित नंबरप्लेट मिळविण्यासाठी नागरिकांच्या नशिबी हेलपाटे-मनस्तापच येतो. त्यपूर्ण उपाययोजना आवश्यक आहेत. त्याची जबाबदारी सरकार आणि निवडणूक आयोगाचीच आहे. त्यासाठी कोणतीही नवी योजना ङ्गबुलडोझरफ पद्धतीने न राबवता सर्वपक्षीय प्रतिनिधींशी चर्चा करून मार्ग काढावा लागेल. आधार व मतदार ओळखपत्राची शंभर टक्के जोडणी झाल्याशिवाय या उद्देशांची पूर्तता होणे शक्य नाही; तर दुसरीकडे घटना व कायदे त्याची सक्ती करू देत नाहीत, असे चित्र आहे. अशा घोषणांना सुस्पष्ट कायद्यांचे अधिष्ठान नसेल, तर त्यांना निवडणूक आयोगाच्या नव्या शेरोशायरीपलीकडे फारसे महत्त्व देता येणार नाही.

# तापदायक तापमान

महाराष्ट्रातील तापमानात वाढ होत असतानाच मध्य महाराष्ट्रात पाऊस तर विदर्भात उष्णतेच्या झळा बसत आहेत. राज्यात येत्या चार-पाच दिवसांत हवामान कोरडे राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ झाली असून विदर्भ, मराठवाड्यातील तापमानात किंचित वाढ झाली आहे. गत २४ तासांत राज्यात सर्वांत जास्त तापमान ब्रह्मपुरी येथे ३९.३ तर सर्वांत कमी अहिल्यानगर येथे १५.७ अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले. मराठवाड्यात २४ मार्चपासून २९ मार्च दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. संपूर्ण जगाला हवामान बदलाच्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. राज्याला फेब्रुवारीपासूनच कडक उन्हाच्या झळा बसत आहेत. जागतिक स्तरावर तापमानात सरासरी १.६५ सेल्सिअस वाढ झाली आहे. त्यामुळे आतापासूनच योग्य पावले न उचलल्यास दुष्काळ, समुद्राच्या पातळीत वाढ आणि प्राणी-पक्ष्यांना धोका निर्माण होईल अशी चिंता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. २३ मार्च हा जागतिक हवामान दिन म्हणून साजरा झाला. या पार्श्वभूमीवर जागतिक तापमानवाढ, हवामान बदल यावर जगभरात मोठ्या प्रमाणावर विचारमंथन सुरू झाले आहे. विविध मानवी उलाढालींमुळे जागतिक तापमानात वाढ होत आहे. वीज प्रकल्प, वाहतूक, इंधन यामुळे जगात १.२ अंश सेल्सिअस तापमान वाढले आहे. १९ व्या शतकापासून आतापर्यंत वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड या हरितगृह वायूचे प्रमाण ५० टक्क्यांनी वाढले आहे. गत २० वर्षांत त्यात १२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हवामान बदलाचे अनपेक्षित परिणाम दिसायला सुरुवात झाली आहे. मुसळधार पाऊस, वादळ, सुपिक जमीन ओसाड होणे, उष्णतेची लाट असे बदल दिसू लागले आहेत. या शतकाच्या अखेरपर्यंत पृथ्वीचे तापमान दोन अंशांनी वाढण्याची शक्यता आहे. शास्त्रज्ञांनी हवामान बदलासाठी १.५ अंश सेल्सिअसपर्यंत तापमानवाढीची मर्यादा ठरवली होती. २०२४ मध्ये जगाचे सर्वसाधारण तापमान १.६५ अंश सेल्सिअसपर्यंत नोंदवण्यात आले. ते आता १.५ अंश सेल्सिअसपर्यंत रोखणे गरजेचे आहे. विविध मानवी घडामोडींमुळे जागतिक तापमानात झपाट्याने वाढ होत आहे. वीज प्रकल्प, वाहतूक आणि घरात इंधन, गॅस, कोळसा वापरामुळे तापमानात वाढ होण्यास मदत झाली. इंधनाच्या वापरामुळे हवेत सोडले जाणारे वायू सूर्याची ऊर्जा अडवतात. हरितगृह वायूचे प्रमाण वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे जंगलतोड. संयुक्त राष्ट्रसंघाने (युनो) यंदाचा आंतरराष्ट्रीय जलदिन ङ्गहिमनद्यांचे संरक्षण आणि संवर्धनफ्म्या संकल्पनेसाठी साजरा करण्याचे आवाहन केले होते. बर्फ, बर्फाच्छादित डोंगर, हिमनग, हिमनद्या आदींचा आपल्याशी काय संबंध असे सर्वसामान्यांना वाटू शकते. परंतु हिमनद्या सांभाळणे केवळ हिमालयासाठी नव्हे तर मानवजात व निसर्गासाठी आवश्यक आहे. माणसाला जगण्यासाठी हवेनंतर आणि अन्नाआधीही अत्यावश्यक बाब म्हणजे पाणी. पृथ्वीच्या वातावरणात पाण्याचे प्रमाण सुमारे ७० टक्क्यांहून अधिक आहे. माणसाच्या आणि सजीवांच्या शरीरात पाण्याचे प्रमाण सुमारे ६० ते ७० टक्के आहे. वनस्पतींमध्ये पाण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्के आहे. या सर्वांसाठी पाण्याच्या उपलब्धतेबाबतची स्थिती मात्र भयंकर आहे. उन्हाळा संपण्यासाठी अजून तीन महिन्यांचा अवकाश आहे. मात्र आतापासूनच देशात अनेक ठिकाणी ङ्गपाण्याची आणीबाणीफ सुरू झाली आहे. कोरड्या ठणठणीत विहिरी, कोरडे तलाव, नद्यांचे वाळवंटीकरण, गाव शहरातील पाणीपुरवठा विभागात ठणठणाट अशी स्थिती आहे. या पार्श्वभूमीवर ङ्गहिमनद्या संवर्धनाफ्चे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. मनुष्य, जनावरे, शेती, उद्योग आणि पर्यटन यासाठी प्रामुख्याने पाणी लागते. सजीव प्राण्यांसाठी बव्हंशी गोडे पाणी लागते पण गोड्या पाण्याची उपलब्धता कमी झाली आहे. कारण आपण मुक्त हस्ते जलप्रदूषण वाढवत आहोत. सांडपाणी, मलविसर्जन आणि अन्य घाण यामुळे नदी नाले-तलाव दूषित होण्याचे प्रमाण वाढले आहे. हवामान बदल आणि तापमानवाढ यामुळे पाण्याचे अतिरिक्त बाष्पीभवनाचे प्रमाण वाढले असून त्यामुळे गोड्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. मोठमोठे हायवे, उंच इमारती, कारखाने, फ्लाय ओव्हर्स आदी पायाभूत उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू असल्याने पाणी कमी पडत आहे. पाणी जपून वापरा असे आवाहन केले जाते पण त्याचे पालन कोणीच करत नाही. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण विपुल असले तरी त्यातील ९०-९५ टक्के पाणी समुद्रातील आहे. हे पाणी मनुष्य, पशू व वनस्पतींसाठी उपयुक्त नाही. हे पाणी खारे आहे. पृथ्वीवर उपलब्ध पाण्यापैकी फक्त अडीच टक्के पाणी हे गोडे आहे. जगातील ७० टक्के गोडे पाणी हिमनगात आहे. त्यामुळे हिमनद्यांचे संवर्धन आवश्यक आहे. गत काही वर्षांत हिमनग वितळण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे गंगा, सिंधू, ब्रह्मपुत्रा या नद्यांना येणा-या पुरामुळे होणारे नुकसान वाढले आहे. केवळ नदीला माता मानून आणि तिचे पूजन करून नद्या आणि पाणी वाचणार नाही. त्यासाठी पाण्याचा काळजीपूर्वक वापर, सांडपाण्यावर प्रक्रिया करून फेरवापर, नद्या, तलाव, नाले आणि समुद्रावर आक्रमण न करणे आदी पथ्ये पाळावी लागतील. सध्या तापणा-या उन्हाने यंदाचा उन्हाळा सामान्य नसल्याची जाणीव करून दिली आहे. मार्च महिन्यात अनेक भागांमध्ये उष्णता वाढू लागल्याने तापमानाने ४० अंशाचा टप्पा ओलांडण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आगामी तीन महिन्यांत आपली किती होरपळ होईल ते सांगणे कठीण आहे. पाणवठे कोरडे पडणे, जनावरांच्या पाणी आणि चा-याचा प्रश्न, उष्माघातामुळे होणारे मृत्यू, भाजीपाल्याची कमतरता आणि कडाडणा-या किमती असे अनेक प्रश्न उभे राहणार आहेत. अनेक ठिकाणी उष्णतेचा प्रचंड कहर बघावयास मिळणार हे जवळपास निश्चित आहे. अर्थात या तापमानवाढीस आपणच जबाबदार आहोत. मानवी हस्तक्षेप आणि त्याच्या व्यवहाराचे दुष्परिणाम तापमानवाढीस कारणीभूत ठरत आहेत. मानवी हस्तक्षेपामुळे जंगलतोड सुरू आहे. देशात वृक्षतोड अधिक तर वनीकरणाचे प्रमाण गरजेपेक्षा अत्यंत कमी आहे. पाणी संकलनाचे प्रमाण कमी झाल्याने यंदा वातावरण अधिक तापताना दिसत आहे. पाण्याच्या साठवणुकीच्या समस्या वाढत आहेत. हवामानातील बदलामुळे पाऊस कमी झाला आहे. पाऊस झालाच तर अचानक आणि प्रचंड प्रमाणात होतो. या जणू काही धोक्याच्या घंटा आहेत परंतु त्या ऐकू आल्या तरच ना!

# ध्यास आणि श्वास तुकोबाराय असलेले परशुराम महाराज मराड

बीड शहर व परिसरामध्ये अनेक ऐतिहासिक मंदिरं तसेच नव्याने झालेले विविध मंदिर आहेत. अलीकडच्या काळामध्ये अनेक ठिकाणी संतांचे मंदिरही उभा राहत आहेत. बीड शहरापासून अगदी तीन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या तळेगाव परिसरामध्ये जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे भव्यदिव्य मंदिर निर्माण करणारे माजी प्राचार्य, भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श शिक्षक ह.भ.प. प्राचार्य परशुराम महाराज मराडे सर म्हणजे ज्यांचा ध्यास आणि श्वास संत तुकाराम महाराज आहेत असंच वर्णन त्यांच्यासाठी लागू आहे. हा लेख लिहिण्यामागचं कारण दिनांक २६ मार्च रोजी महाराजांचा ७३ वा वाढदिवस आहे. त्यांचे संपूर्ण नाव परशुराम पाटीलबुवा मराडे असे आहे. त्यांचा जन्म नारायणगडाच्या पायथ्याशी असणाऱ्या पौंडुळ या गावी २६ मार्च १९५२ रोजी झाला. घरामध्ये वारकरी परंपरा. त्यांचे वडील पाटीलबुवा हे महान संत भगवान बाबा यांचे सहकारी व अत्यंत जिवलग मित्र होते. तसेच ते बंकटस्वामींच्या प्रमुख टाळकऱ्यांपैकी एक टाळकरी व वारकरी संप्रदायाचे कीर्तनकारही होते. माझ्या वडिलांची मिराशी गा देवा । तुझी चरण सेवा पांडुरंगा ।। संत वचनाप्रमाणे परशुराम महाराजांना वारकरी संप्रदायाचा वारसा आपल्या वडिलांकडून मिळाला.



शिक्षण व नोकरी: परशुराम महाराजांनी एम.ए., बी.एड. पर्यंत शिक्षण घेतले. तेही प्रथम श्रेणीमध्ये...! पदवी परीक्षेमध्ये ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामधून द्वितीय आले होते. त्यांची शैक्षणिक गुणवत्ता पाहून स्मृतिशेष भा.वा. सानप यांनी शिक्षक म्हणून त्यांची १९७३ साली नियुक्ती केली. भगवान शिक्षण प्रसारक मंडळामध्ये शिक्षक, पर्यवेक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य या पदावर ते कार्यरत राहिले. त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना घडवले. सण २०१० साली ते सेवेतून निवृत्त झाले. तुकोबाराय सेवापीठ स्थापना : शिक्षक म्हणून काम करत असतानाही ते भजन, कीर्तन, प्रवचन, व्याख्यान या माध्यमातून समाज जागृतीचे कार्य करत होते. १९८५ पासून त्यांनी गावोगाव कीर्तन केले. वडिलांकडून मिळालेला वारसा आणि अध्यात्माची असलेली आवड यातून त्यांचा पिंड घडला. सेवेतून निवृत्त झाल्यानंतर २०१४ साली तळेगाव परिसरामध्ये जागा घेऊन त्यांनी जगद्गुरु संत तुकोबाराय सेवापीठ या नावाने संत तुकाराम महाराजांचे मंदिर स्थापन केले. त्या मंदिराचे बांधकाम २०१७ मध्ये पूर्ण झाले. त्यासाठी जवळजवळ ७५ लक्ष रुपयाचा खर्च त्यांनी स्वतःहून केला. मंदिरामध्ये भजन, पूजन, नारायणगडची एकादशीची वारी, कीर्तन, प्रवचन, प्रशिक्षण होऊ लागले. मागील १४ वर्षापासून संत तुकाराम महाराज मंदिरामध्ये प्रत्येक द्वितीयेला बिजवारी व त्यानिमित्ताने कीर्तन व पंगतीचा कार्यक्रम आयोजित केला जातो. वार्षिक बीजोत्सव, संत तुकाराम महाराज बीज सोहळा अत्यंत भव्यदिव्य प्रमाणामध्ये साजरा केला जातो. या उपक्रमामध्ये तळेगाव, काकडहिरा, बीड तसेच पंचक्रोशीतील हजारो नागरिक सहभागी होतात.

# पुणे जिल्ह्यात पाणी प्रश्न गंभीर; या गावात महिलांना मिळतंय फक्त दोन हंडे पाणी, तिसऱ्या हंड्याला थेट 100 रुपये

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे, या समस्येवर उपाय म्हणून परसुल गावातील ग्रामस्थानी एक अजब फतवा काढला आहे, या फतव्याची संपूर्ण जिल्ह्यात चर्चा सुरू आहे. नेमकं काय आहे प्रकरण? काय आहे हा फतवा त्याबद्दल जाणून घेऊयात.

पुणे जिल्ह्यातील खेडच्या पश्चिम भागामध्ये हे परसुल गाव आहे. या परिसरात पावसाळ्यामध्ये जोरदार पाऊस पडतो, मात्र उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर होते. त्यामुळे यावर्षी पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये, म्हणून येथील नागरिकांनी अजब फतवा काढला आहे. येथे असलेल्या सार्वजनिक पाणिपुरवठ्याच्या विहिरीवरून दिवसभरात एका कुटुंबाला दोनच हंडे पाणी मिळेल, तिसरा हंडा भरणाऱ्या कुटुंबाला शंभर रुपयांचा दंड असा हा फतवा आहे.

या विहिरीत असलेले पाणी जून महिन्यापर्यंत पुरलं पाहिजे यासाठी गावकऱ्यांनी हा अजब निर्णय घेतला आहे , तसेच येथील अनेक कुटुंब उदरनिर्वाहासाठी शहराच्या ठिकाणी वास्तव्य करत असल्याने गावात वयस्कर महिलांची संख्या अधिक आहे. त्यामुळे सुरक्षेसाठी सकाळी सात ते रात्री सहा पर्यंतच विहिरीवरून पाणी आणायचं असा नियमही तयार करण्यात आला आहे. पाणीटंचाईने पुण्याच्या ग्रामीण भागातील खेड ,आंबेगाव जुन्नर आणि शिरूर तालुक्यातील जनता त्रस्त झाली आहे. खेड तालुक्यातील परसूल येथे महिलांना पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याची वेळ आली असून, दिवसभरात विहिरीवरून दोनच हंडे घरी पाणी न्यायचं. तिसरा हंडा भरला तर शंभर रुपये दंड भरायचा असा नियमच ग्रामस्थांनी घातला आहे.




पुण्याच्या ग्रामीण भागात कोट्यवधी रुपयांची जलजीवन मिशन योजनेची कामं सुरू आहेत. मात्र, आजही काही गावे तहानलेलीच आहेत. पूर्व भाग व पश्चिम भागातील काही गावाला टँकरचा प्रस्ताव सादर करण्याची वेळ आली आहे. तालुक्यातील पश्चिम भागातील परसूल गावात पाण्यासाठी विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे. अजून दोन महिने कडक उन्हाळ्याचे दिवस असणार आहेत, त्यामुळे गामस्थांसमोर पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

# बीड शहराला बारा ते पंधरा दिवसाला एकदा पाणीपुरवठा



बीड । प्रतिनिधी बीड शहरातील पाणी प्रश्न पाणी असूनही गंभीर असून बीड शहरातील नागरिकांना बारा ते पंधरा दिवसाला एकदा पाणी मिळते. आता उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाण्याची आवश्यकता असतानाही आणि पाणी उपलब्ध असतानाही केवळ यंत्रणामुळे पिण्याचे पाणी वेळेवर मिळत नसल्याने या प्रश्नावर संपूर्ण भारत क्रांती पार्टी चे प्रदेशाध्यक्ष अशोक थोरात यांनी लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. बीड शहरामध्ये दोन ठिकाणाहून पाणीपुरवठा होतो. बिंदूसरा प्रकल्प आणि माजलगाव धरणातून बीड शहराला पाणीपुरवठा होतो. मात्र बीड शहरातील पाणीपुरवठा करणारी यंत्रणा सक्षम नसल्याने आणि नगरपालिकेच्या भोंगळ कारभारामुळे बीड शहरातील नागरिकांना तब्बल १२ ते १५ दिवसाला एकदा पाणी मिळते. आता उन्हाळ्याचे दिवस आहेत. त्यामुळे पाण्याची आवश्यकता अधिक आहे तरीही पाणीपुरवठा होत नाही. आता लोकांना स्वतःच्या खर्चाने टँकरने पाणी आणावे लागते किंवा वेळ पडली तर डोक्यावर पाणी आणावे लागते. श्रीमंत लोकांचे ठीक आहे पण गोरगरीब लोकांना हा भुरदंड परवडणारा नाही. या प्रकाराला शेळ्यातील नागरिक त्रस्त झाले असून या प्रश्नावर आंदोलन करण्याचा इशारा संपूर्ण भारत क्रांती पार्टी चे प्रदेशाध्यक्ष अशोक थोरात यांनी दिला आहे. ते या प्रश्नावर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करणार आहेत. यावरही पाणी प्रश्न सुटला नाही तर संपूर्ण भारत क्रांती पार्टीच्या वतीने पाणी प्रश्नावरील आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा अशोक थोरात यांनी दिला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २८ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# शुक्रवारी बीड येथे विश्वस्थांची कार्यशाळा : प्रदिप चौधर

महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यातील विश्वस्तांसाठी १०० दिवसाच्या कृती आराखड्या अंतर्गत व मा.मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून विश्वस्तांसाठी कायद्याचे ज्ञान तसेच न्यास व संस्थेचे कार्य व व्यवस्थापक कायद्यानुसार होण्यासाठी तसेच न्यासाचे कार्य व विश्वस्ताचे उत्तर दायकत्वाची माहिति व सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेमधील कायद्याची माहिती देण्यासाठी विश्वस्त कार्यशाळा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड व बीड जिल्हा धर्मादाय वकिल संघ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज बीड नवगण कॉलेज रोड बीड येथे दि.२८ मार्च रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित केले आहे. या विश्वस्त कार्यशाळेच्या कार्यक्रमाचे अधयक्ष म्हणून धर्मादाय उपायुक्त बीड प्रदिप चौधरी यांची उपस्थिती लाभणार आहे. या प्रसंगी विशेष उपस्थिती म्हणून माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर,तसेच कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक सहाय्यक धर्मादाय आयुक्त सुधीर कांबळे, बीड जिल्हा धर्मादाय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. उदयसिंह सालपे, या विश्वस्त कार्यशाळेचे निमंत्रक म्हणून उपस्थित राहतील. या सर्वांच्या उपस्थितीत विश्वस्तांना विश्वस्त कार्यशाळेव्दारे संस्थेच्या व न्यासाच्या पदाधिकार्यासह विश्वस्तांना अमुल्य मार्गदर्शन देण्यासाठी या विश्वस्त कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून धर्मादाय सह आयुक्त लातूर राजेश ससाणे यांच्या उपस्थितीत जिल्ह्याच्या विश्वस्तांना मार्गदर्शन लाभणार आहे.

# महात्मा फुले युवा दलाच्या वतीने फुले दांपत्य जीवन गौरव पुरस्कार घोषणा

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या विचारांचा वसा व वारसा आपल्या कामातुन पुढे घेऊन चालणारे, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत असलेल्या व सामाजिक न्याय, समता, बंधुता, प्रबोधन व समाजाच्या उन्नतीसाठी सर्मर्पित कार्य करत असलेल्या दांपत्याच्या कार्याची दखल घेऊन महात्मा फुले युवा दलाच्या वतीने महात्मा फुले यांच्या जयंतीच्या औचित्याने प्रतिवर्षी महाराष्ट्रातील एका दांपत्याचा सन्मान केला जाणार असल्याची माहिती माध्यमांशी बोलताना महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक



प्रमुख ॲड. सतिष शिंदे यांनी सांगितले. हा पुरस्कार हा महाराष्ट्रातील एका दांपत्याला दिला जाणार असुन पुरस्काराचे स्वरूप हे सन्मानचिन्ह, मानपत्र, फुले पगडी, साडीचोळी व रोख ११०००/- रुपये असुन या वर्षीच्या पुरस्कारासाठी समितीच्या वतीने इन्फंटचे इंडियाचे बारगजे दांपत्य यांची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार लवकरच मान्यवरांच्या उपस्थितीत एप्रिल महिन्यात वितरण करणार असल्याची माहिती महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड. सतिष शिंदे यांनी दिली आहे.

# डॉ.थोरात यांचे निलंबन मागे घेण्यात यावे!

केज : बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक दादा थोरात साहेब यांचे निलंबन ५ एप्रिल २०२५ पर्यंत मागे घेतले नाही तर ५ एप्रिल २०२५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा रोहन गलांडे पाटील यांनी सरकारला निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.या विषयी सविस्तर वृत्त असे की शल्यचिकित्सक डॉ.अशोक दादा थोरात साहेब यांचे निलंबन ५ एप्रिल २०२५ पर्यंत मागे घेतले नाही तर ५ एप्रिल २०२५ रोजी आत्मदहन करण्याचा इशारा सरकारला देतो निवेदनाद्वारे देण्यात येत आहे तरी मला आंदोलना दरम्यान काही झाले तर सरकार,





प्रशासनान जबाबदार राहील यांची नोंद प्रशासनाने तातडीने घेऊन माझी मागणी मान्य करण्यात यावी अशी मागणी रोहन गलांडे यांनी सरकारला व प्रशासनाला निवेदनाद्वारे करण्यात केली आहे. बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी कोरोना काळात कथित भ्रष्टाचार केला असा आरोप केज मतदार संघाच्या आमदार नमिता अक्षय मु ंदडा यांनी विधान सभेत लक्षवेदी लावुन चुकीच्या व सुड बुध्दीने कार्यावाही केलेली आहे. म्हणून सकल बहुजन समाज, केज तालुका यांच्या वतीने सुध्दा डॉ. अशोक थोरात यांच्यावर केलेली कार्यवाही नात्काळी मागे घ्यावी अन्यथा केज तालुक्यात तिवृ स्वरुपाचे आंदोलन करु असे निवेदन यावेळी देण्यात आले आहे. यावेळी उपस्थित युवा नेते राहुल खोडसे ,अंबाड योगेश,राधाताई सपकाळ,निर्मला सातपुते ,लखन हजारे, धपाटे,कदम यावेळी उपस्थित होते.

# माजलगाव शहर पोलिसांनी पाच मोटरसायकल जप्त करीत, २ चोरांना केले अटक

शहर पोलिसांनी बुधवारी मोटरसायकल चोरी करणाऱ्या दोघा जणांना जेरबंद केले असून त्यांच्याकडून चोरीच्या पाच मोटरसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत. तालुक्यातील सादोळा येथील रणजीत जगन्नाथराव सोळंके यांची मोटरसायकल दिनांक २७ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वा दरम्यान पूर्णवादी बँक समोरून चोरी गेली होती याबाबत त्यांच्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणी पोलीस निरीक्षक राहून सूर्यतळ यांनी तपास चक्रफिरवून आरोपीचा शोध सुरू केला होता. चार दिवसापूर्वी त्यांच्या हाती धागे दोरे लागल्याने त्यांनी जेय महेश साखर कारखाना परिसरात शोध घेतला असता तेथून सचिन सुरेश बैत, रवींद्र सुरेश बैत यांना ताब्यात घेऊन उलट तपासणी केली असता सोळंके यांची मोटरसायकल चोरल्याची कबुली देत पूर्णवादी बँक माजलगाव येथून चोरी केलेल्या ३ मोटरसायकल व इतर ठिकाणावरून चोरीस केलेल्या २ मोटरसायकल चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी एकूण ५ पाच मोटरसायकल किंमत अंदाजे २ लाख तीस हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. सदरची कारवाई पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक केरबा माकने, अनिल भालेराव, गणेश तळेकर, संतराम थापडे, यांनी केला आहे.

# बालेपिरमध्ये गंगा जमुना संस्कृतीचे दर्शन हिंदू बांधवांकडून रोजा इफ्तारीचे आयोजन



बीड । प्रतिनिधी पवित्र रमज़ान महिना सुरू आहे देशात व राज्यात राजकीय नेत्यांकडून धार्मिक जातीयद्वेष पसरवून दोन समाजामध्ये भांडणं लावून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न होत असताना व आपण जनता पण तेवढीच जबाबदार असताना या नेत्यांच्या भुलथापांना बळी पडतो. अशा गढूळ वातावरणात आज पण देशप्रेम बंधूभाव व इतर समाजाबद्दल प्रेम आपूलकी जिव्हाळा पहावयास मिळत आहे. बीड शहरातील बालेपिरमध्ये गंगा जमुना संस्कृतीचे तहज़ीबचे दर्शन हिंदू बांधवांकडून पवित्र रमज़ान रो ज़ा इफ्तारीचे आयोजन करून पहावयास मिळाले या इफ्तारीमध्ये हिंदू मुस्लिम दोन्ही समाजाकडून लोक बहुसंख्येने उपस्थित होते सर्वांचे आभार लांडकमारे सर भौंडवे गुरुजी शहाणे मामा वसंत गुरुजी तावरे मामा सोनसळे साहेब व मस्जिद कमिटीचे अमीर शेख महमूद सदर इमरान फारूकी सचिव इलियास इनामदार व नदीम मेंबर शेख अकबर सय्यद खदिर सरफराज काज़ी फारूक शेख इत्यादींनी आभार मानले.

# ज्ञानदीप विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात

किल्ले धारूर । प्रतिनिधी तालुक्यातील ज्ञानदीप विद्यालयामध्ये स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त इ. सातवी वर्गातील विद्यार्थ्यांनी सकाळी परिपाठापासून ते शाळा सुटेपर्यंतचे मुख्याध्यापक, शिक्षक ते सेवक पर्यंतच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत सर्व नियोजन केले. सकाळी आल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी दररोज प्रमाणे शालेय परिपाठाचे सादरीकरण केले तसेच सर्व विषयाच्या वर्गानुसार तासिका घेतल्या. या स्वयंशासन दिनाची मुख्यापक म्हणून कु. विश्वजीत माणिक पवार तर उपमुख्याध्यापक चि. सोहम रमेश बांगर तसेच सेवक व इतर विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या हा स्वयंशासन दिन यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक श्री. रामराजा दराडे सर व अशोक अंडील सर व सरिता भोसले मॅडम यांनी नियोजन केले तर सौ. शैला महाजन मॅडम यांनी स्वयंशासन दिनानिमित्त सातवी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना शालेय उपयुक्त असे विविध पुस्तके दिली. सर्व शिक्षकांच्या सहकार्यातून आजचा स्वयंशासन दिन उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न झाला.

# दीड लाख रुपयांची लाच घेताना क्रीडा अधिकारी कविता नावंदे जाळ्यात

परभणी। प्रतिनिधी राज्यात गेल्या काही महिन्यात एसीबी म्हणजे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाईचा धडाका लावला असून अनेक सरकारी कर्मचारी, अधिकारी जाळ्यात अडकल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामध्ये, पोलीस, वन, महसूल विभागासह विविध शासकीय विभागातील अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. त्यात, महिला अधिकारी, कर्मचारीही आहेत. आता, परभणी जिल्ह्यातील एसीबीकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे एसीबीच्या जाळ्यात अडकल्या आहेत. स्विमिंग पूल बांधण्यास परवानगी देण्यासाठी कविता नावंदे यांनी अडीच लाख रुपयांची लाच मागितली होती. त्यातील, दीड लाखांची लाच घेताना रंगेहात पकडले आहे. परभणी जिल्ह्यातील क्रीडा विभागात लाचप्रकरणामुळे खळबळ उडाली आहे. एका क्रीडा स्पर्धेचे बिल आणि स्विमिंग पुल मान्यतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी लाच मागितली होती. कविता यांनी या मंजुरीसाठी संबंधितांकडे अडीच लाख रुपयांची लाच मागतली होती, ज्यात दीड लाख रुपये स्वीकारताना त्यांना एसीबीच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले आहे. परभणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईमुळे जिल्ह्याच्या प्रशासकीय वतु ळात खळबळ उडाली आहे.



माजलगाव-प्रतिनिधी वाढदिवस म्हंटल की, अमाप खर्च होतो.मात्र या खर्चाला फाटा देऊन पत्रकार बाळासाहेब अडागळे यांनी त्यांचा मुलगा आयुष याचा वाढदीवस अगदी कौतूकास्पद साजरा केला. हा जन्मदिन मुक बधिर विद्यालयातील मुलांना खिचडी व खाऊचे वाटप करुन साजरा केला. त्यामुळे माणुसकीचे मूल्य संवर्धित झाले असून पत्रकार बाळासाहेब अडागळे यांचे कौतूक होत आहे.

# अनुसूचित जमातीचे दाखला देताना १९५० पूर्वीचा पुरावा आग्रह नको

धारूर । प्रतिनिधी अनुसूचित जमातीचा दाखला देताना १९५० पूर्वीचा पुरावाचा आग्रह धरू नका असे स्पष्ट आदेश मु ंबई उच्च न्यायालयाने दिला आहे अपेक्षा सोपान माने यांनी आपल्याला कोळी महादेव चे प्रमाणपत्र देण्याबाबत सांगोला प्रतीकडे तसा अर्ज सादर केला होता परंतु त्यांच्याकडे १९५० पूर्वीचा पुरावा नाही म्हणून हा अर्ज सादर केला होता परंतु त्याच्याकडे १९५० पूर्वीचा पुरावा नाही म्हणून हा अर्ज प्रत अधिकाऱ्याकडून नाकारण्यात आला होता त्यामुळे या निर्णयाचा विरोधात माने यांनी जात पडताळणी समिती पुणे यांच्याकडे अपील सादर केले होते ते आपली या समितीने भेटाळून लावली होते. आखिर या निर्णयाविरोधात दाद मागण्यासाठी माने यांनी मु ंबई उच्च न्यायालयात त दावा दाखल केला होता त्यामुळे मु ंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती एस एम कर्णिक व अश्विनी बोबे यांनी १८ मार्च २०२५ रोजी दिलेल्या निकालात अनुसूचित जमातीचे दाखला देताना संबंधितांना १९५० पूर्वीचा पुरावाचा आग्रह धरू नये त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राची तपासणी करून त्यांना दाखला द्यावा अशी पोस्ट आदेश दिले आहेत तसेच जर एखाद्याकडे १९५०



पूर्वीचा पुरावा असेल तरच त्यांना अनुसूचित जमातीचा दाखला द्यावा अशा प्रकारचा कोणतीही तरतूद कायद्यात नसल्याचेही न्यायमूर्ती कर्णिक व बोबे यांनी आपल्या आदर्श स्पष्ट केले आहे यात माने यांच्यातर्फे अँड चिंतामणी भोगोजी यांनी काम पाहिले, दरम्यान मु ंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या या आदेशाचे महाराष्ट्र कोळी समाज संघाचे प्रदेश उपाध्यक्ष सुधाकर मुसलादी यांच्या सह कोळी महादेव समाजातील बांधवांनी स्वागत केल्या असून या आदेशामुळे कोळी महादेव समाजातील लोकांना व इतर अनुसूचित जमातीत बांधवांना आपल्या जातीचे दाखले सुलभ पद्धतीने मिळवणे अधिक सोपे होणार आहे अशी माहिती मु ंबई उच्च न्यायालयाच्या आदेशा खाली कोळी समाजाला मिळालेले आहे. तरी आता बीड जिल्ह्यातील कोळी समाजाचा जातप्रमाणपत्र देण्यासाठी १९५० च्या पुरावा आग्रह नको अशी मागणी बीड जिल्ह्यातील आदिवासी कोळी समाज माजलगाव उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले यांच्या कडे करत असताना दिसत आहे तरी आता कोळी समाजाचा जातप्रमाणपत्र देण्यासाठी उपजिल्हाधिकारी काय करणार असे आता कोळी समाजाचे लक्ष लागले आहेत तरी हा आदेशामुळे उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले यांनी १९५० च्या पुरावा आग्रह धरू नये या मु ंबई उच्च न्यायालयाचे आदेशाखाली जात प्रमाणपत्र देण्यासाठी सुरुवात करावी अशी मागणी कोळी समाजाकडून होत आहे तरी लवकर मु ंबई उच्च न्यायालयाच्या हायकोर्टाच्या आदेशाचे पालन करून उपजिल्हाधिकारी माजलगाव यांनी जात प्रमाणपत्र देण्यास सुरुवात करावी, अशी मागणी कोळी महासंघाचे युवा ता अध्यक्ष वाल्हे गंगाधर यांच्याकडून होत आहे.

# मी मुंडे-कराडच्या गाड्या पकडत होतो माझ्या खात्यात दहा लाख कसे आले

बीड । प्रतिनिधी बीडमध्ये एकीकडे संतोष देशमुख खून प्रकरण गाजत असताना दुसरीकडे बीडच्या पोलिस दलामध्ये मोठमोठ्या घडामोडी घडत आहेत. त्यातच पीएसआय रणजित कासले यांना एका प्रकरणात निलंबित करण्यात आलं आहे. त्यानंतर कासले हे आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन वेगवेगळ्या पोलखोल करीत आहेत. निलंबित पीएसआय कासले यांनी थेट धनंजय मु ंडे आणि वाल्मिक कराडचं नाव घेत गंभीर आरोप केले आहेत. एका व्हिडीओमध्ये ते म्हणतात, विधानसभेची निवडणूक पार पडली तेव्हा मला परळीमध्ये बंदोबस्त लावण्यात आलेला होता.पेट्या येणार होत्या त्या दिवशी माझी ड्युटी बदलण्यात आली. कारण मी अगोदर वाहतूक शाखेत होतो तेव्हा मी वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडेंच्या गाड्या पकडल्या होत्या. परंतु आमच्या पीआयने त्यावर कारवाई करु दिलेली नव्हती. गाड्या पकडत होतो, अडवत होतो. त्यामुळे मला निवडणूक ड्युटीपासून दूर केलं.फ्फ़तुम्हाला ड्युटी नाही, असं मला सांगण्यात आलेलं होतं. मला रिझर्व्ह ठेवण्यात आलेलं होतं. मला वेगळं वाटत होतं. त्याच दिवशी माझ्या अकाऊंटवर १० लाख रुपये आले. संत बाळूमामा कन्स्ट्रक्शन या खात्यातून माझ्या पगाराच्या खात्यात पैसे आले. हे पैसे का आले याचा शोध गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लावला पाहिजे. त्यानंतर काही लोकांनी माझं लोकेशन काढलं. करमाळा, बार्शीपर्यंत मला घेऊन गेले. मी त्या चार लोकांच्या पाया पडलो आणि माझ्या मित्राला फोन केला, त्याने मला सोडवलं.फ्फ़ असं कासले म्हणाले.यांना भेटा व त्यांची मागणी पूर्ण करा असा मेसेज सुनील शिंदे आणि शिवाजी थोपटे यांना दिला. त्याची व्हिडिओ रेकॉर्डिंग सुनील शिंदे यांच्याकडे आहे. २९ तारखेला दुपारी सव्वा दोन वाजता वाल्मीक कराड व इतर सर्व आरोपी विष्णू चाटेच्या केज येथील पक्षाच्या कार्यालयात भेटले. त्याचे सीसीटीव्ही फुटेज, टॉवर लोकेशन, पुरावे आहेत. ६ डिसेंबर रोजी सुदर्शन घुले, प्रतीक घुले सुधीर सांगळे, हे साडेबारा वाजता आवादा कंपनीच्या मसाजोग येथील ऑफिसमध्ये आले. सुरक्षा रक्षकाला शिवीगाळ केली मारहाण केली. त्यावेळी शिवाजी थोपटे बाहेर आले. यावेळी सुदर्शन घुले यांनी सांगितले दोन कोटीची मागणी पूर्ण करा किंवा काम बंद करा. यासंदर्भात माहिती सरपंच संतोष देशमुख यांना कोणीतरी दिली. हा वाद मिटवण्यासाठी सरपंच संतोष देशमुख व गावातील काही लोक आले. यावेळी सुदर्शन घुले यांनी संतोष देशमुख यांना धमकी दिली. त्यानंतर याची पोलिसांना माहिती दिली. दुपारी दीड वाजता पोलीस घटनास्थळी दाखल झाले व घुले व इतर आरोपींना ताब्यात घेऊन गेले. पण या सर्व आरोपींना प्रत्यक्ष अटक ७ डिसेंबर रोजी पहाटे दाखवण्यात आली. पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतली नाही, असे निकम यांनी न्यायालयाला सांगितले. ७ डिसेंबर २०२४ च्या रात्री आठ वाजता वाल्मीक कराडला घुलेने फोन केला. फोनवर घडलेली संपूर्ण हकीकत सांगितली. यावेळी कराडने अडथळा आणतील त्यांना संपवा असे सांगितले, अशी कबुली घुले याने दिली आहे.

# जिजाऊ मल्टीस्टेट संचालकांची मालमत्ता जप्त करा-अशोक हिंगे

बीड । प्रतिनिधी जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट २०० कोटी ठेव घोटाळा प्रकरणात ठेवीदारांना न्याय देण्यासाठी राज्य सरकारने एमपीआयडी प्रस्ताव मंजूर करून मालमत्ता जप्तीची कारवाई सुरू केली आहे. परंतु दुर्दैवाने या मांलमत्तेवर जप्ती यादीत संचालकांच्या मालमत्तेचा समावेश नाही. एमपीआयडी कायद्याचे काटेकोरपणे वापर करून सर्व संचालक, आरोपी व तत्सम संबधीतांच्या मालमता शोधून जप्तीची कारवाई करावी अशी मागणी जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेवीदार संघर्ष कृती समीतीने केली असुन यात दिरंगाई झाल्यास ठेवीदारांच्या वतीने उपोषण आंदोलन करण्यात येईल असा इशारा संघर्षकृती समितीचे मार्गदर्शक अशोकराव हिंगे यांनी दिला आहे. काल संघर्ष कृती समितीचे मार्गदर्शक अशोकराव हिंगे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधीक्षकांना लेखी निवेदन देण्यात आले. यावेळी अशोकराव हिंगे, शेख कुतुब भाई, इंजि. सखाराम कळासे,मारूती तिपाले, लक्ष्मण हाटवटे, भाऊसाहेब परसे, प्रा. राजाभाऊ माने, रविंद्र पालीमकर, सुभाष शिरोळे डॉ. उंब्रजकर ,चाटे वाल्मिक प्रवीण पोपळे, वैंगुडेसर बजरंग शेळके, वैद्य दत्तात्रय, नन्नवरे, आर एस गायकवाड, राजाराम घोलप आदी ठेवीदार उपस्थित होते. जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट विरोधात ३ जुलै २०२३ मध्ये गुन्हा नोंद झाला.पोलीस तपासा नुसार १६७ कोटीच घोटाळा नमुद केला गेला. महाराष्ट्र ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण १९९९ अधिनियमाच्या अंतर्गत गुन्हा नोंद असल्याने सर्व आरोपी, संचालक मंडळ, व आरोपींच्या जवळच्या नातेवाईकांचे अर्थिक संबंध लक्षात घेऊन तत्सम व्यक्तींच्या मालमत्ता जप्त करणे गरजेचे आहे. परंतु २६ आरोपी पैकी केवळ चार पाच आरोपींच्या मालमत्तावर कारवाई चालू आहे. उर्वरित आरोपी मध्ये संचालक मंडळाचा समावेश आहे. संचालक मंडळात आरोपी बबन शिंदे यांची भावजयी, भाचा नातलगांचा समावेश आहे.

## सावळेश्वर पैठण जवळ झालेल्या जीप- मोटरसायकल अपघातात



केज : तालुक्यातील कळंब अंबाजोगाई महामार्गावर सावळेश्वर व औरंगपूर शिवाराच्या सीमेवर बुधवारी दुपारी ३ वाजण्याच्या दरम्यान भरधावं पिकअपने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील दोन वीटभट्टी कामगार जागीच ठार झाले. सुभाष आश्रुबा मोहिते (५०) आणि सुनिल भीमराव पवार ( ४०, दोघेही रा बार्शी, ह. मु. सातेफळ वीटभट्टी) अशी मृतांची नावे आहेत. बार्शी येथील काही कामगार अंबाजोगाई तालुक्यातील सातेफळ येथील वीटभट्टीवर काम करतात. नातेवाईक आजारी असल्यामुळे येथील सुभाष आश्रुबा मोहिते आणि सुनिल भीमराव पवार हे दोन कामगार दुचाकीवरून ( क्रमांक एम एच २५ / ए बी ४१९८) बार्शीला गेले होते. बुधवारी दोघेही परत सातेफळकडे निघाले. यावेळी दुपारी ३ वाजण्याच्या दरम्यान सावळेश्वर व औरंगपूर शिवाराच्या सीमेवर त्यांच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या भरधाव पिकअकने ( क्रमांक एम एच २० /जी सी २१०८) जोराची धडक दिली. यात दुचाकीवरील दोन्ही कामगारांचा मृत्यू झाला. माहिती समजताच सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे, पोलीस कर्मचारी सीताराम डोंगरे, गणेश राऊत, महादेव केदार, रामनाथ वारे यांनी अपघातस्थळाला भेट देऊन पंचनामा केला. दोघांचा मृतदेह अंबाजोगाई येथील स्वराती रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे.

# गेवराईत शाळकरी विद्यार्थांना छावा चित्रपट दाखविला मोफत

गेवराई । प्रतिनिधी गेवराई शहरातील तरुण शेतकरी सुनिल ठोसर हे आपल्या वेगवेगळी अंदोलने शासन स्तरावर शेतकऱ्यांसाठी करतात यासाठी ते संपूर्ण गेवराई तालुक्यात परिचित आहे. अशा अंदोलना बरोबरच ते तालुक्यातील शालीय विद्यार्थ्यांसाठी देखील शालेय साहित्य, फळ वाटप, मिस्ठाण जेवन, क्रिडा स्पर्धासह शिक्षकांचा आजवर गौरव करत आले आहेत. आता तर त्यांनी आगळा वेगळा उपक्रम राबवित गेवराई तालुक्यातील गोरगरिब शाळकरी विद्यार्थ्यांसाठी सुरु केला आहे. आजवर ग्रामीण भागातील असे विद्यार्थी गेवराई शहरात येऊन महागडे तिकीट काढून चित्रपट पाहण्यास कुणी पुडे येत नाही. मात्र यावर सुनिल ठोसर यांनी अशा विद्यार्थ्यांसाठी स्वतः तिकिटे काढून गेवराई येथील चित्रपट गृहात मोफत छावा हा मराठी चित्रपट दाखविण्यास विद्यार्थांना सुरवात केली आहे. याला ग्रामीण भागातील विद्यार्थी उत्स्फुर्त प्रतिसाद देऊ लागले आहे. यानिमित्ताने ग्रामीण भागातील अनेक गरिब विद्यार्थांनी प्रथमच गेवराईतील चित्रपट गृह पाहिल्याचे दिसून आले. दरम्यान सुनिल ठोसर यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे तालुक्यातील विद्यार्थी, शिक्षक, पालक व नागरिकांमधून कौतूक होत आहे. गेवराई शहरात व तालुक्यातील ग्रामीण भागात तरुण शेतकरी सुनिल ठोसर हे शेतक-यांच्या विविध प्रश्नासाठी हमखास शासन स्तरावर लढा देतात. याच बरोबर तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळेत शालीय विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या पध्दतीने आजवर मदत करत आले. शिवाय शिक्षक, तलाठी, उपजिल्हा रुग्णालयांमध्ये आदिसह गोरगरिब नागरिकांना आपल्या परिने संकटकाळी मदत करत आहे. अशातच सध्या मराठी चित्रपट छावा हा सर्वत्र गाजत आहे. मात्र हा चित्रपट गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळकरी मुलांना गेवराई येथे प्रवासाचा खर्च करुन व महागडे तिकीट काढून पाहण्यास परवडत नसल्याचे शेतकरी सुनिल ठोसर यांच्या निर्दशनास आले. मग काय त्यांनी अशा ग्रामीण भागातील शाळकरी मुलांनी हा चित्रपट पाहवा म्हणून विविध ग्रामीण भागातील शाळकरी मुलना हा चित्रपट मोफत दाखवण्याचा संकल्प केला. सर्व प्रथम देवपिंप्री येथील २५ जिल्हा परिषद शाळेतील मुलांसाठी प्रत्येकी जवळपास १५० रुपायांचे तिकीट काढून त्यांना गेवराई येथील भगवती चित्रमंदिरात शिक्षकांसह हा छावा चित्रपट दाखविला. तसेच त्यांचा



येण्या जाण्याचा प्रवास खर्च देखील केला. यामुळे ग्रामीण भागातील शाळकरी मुलांना हा प्रसिध्द चित्रपट पाहण्याचा योग आला आहे. आमच्या ग्रामीण भागातील गोरगरिब शाळकरी मुले कधीही गेवराई शहरात जाण्या येण्याचा प्रवाचा खर्च व चित्रपटाचे महागडे तिकीट काढून चित्रपट पाहण्यास आजवर गेले नाही. मात्र सुनिल ठोसर यांनी स्तुत्य उपक्रम राबवित आमच्या मुलांना गेवराई येथे नेऊन छावा चित्रपट दाखवल्याने आम्हाला व गावकऱ्यांना समाधान होत आसल्याचे पालक वर्गातून बोलले जात आहे.

# बीडच्या बिंदुनामावली मुद्द्यावर मंत्रालयात विशेष बैठक

## नियुक्त्यांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्तांची समिती

मुंबई : बीड जिल्ह्यातील सर्वच शासकीय विभागांमध्ये अधिकारी आणि आणि कर्मचारी यांची नियुक्ती बिंदुनामावलीनुसार झालेल्या नाहीत. यासंदर्भात मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. यविषयी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.२६) रोजी मंत्रालयात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत, बीड जिल्ह्यात झालेल्या शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या नियुक्त्यांमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्याचे आदेश ना.अजित पवार यांनी दिले आहेत. याबाबत आ.सुरेश धस, आ.प्रकाश सोळंके, आ.संदीप क्षीरसागर यांनी तक्रारी केल्या होत्या. तसेच विधीमंडळात



देखील हा मुद्दा अनेकवेळा उपस्थित केला गेला होता. शासनाच्या विभागांमध्ये बिंदुनामावलीनुसार पदांची मागणी करून पदभरती करण्यात येते. परंतु पदभरतीनंतर नियुक्ती देताना तसेच बदली व प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी बिंदुनामवलीचा वापर केला जात नाही. त्यामुळे मागील काळात बीड जिल्ह्यामध्ये एका विशिष्ट प्रवर्गाचेच अधिकारी आणि कर्मचारी प्रचंड संख्येत नियुक्त झाले आहेत. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात सामाजिक असमतोल निर्माण झाला असून त्याचा परिणाम शासकीय कामकाजावर विपरीत स्वरूपात झालेला आहे. विशेषतः पोलीस विभागातील नियुक्ती आणि आंतरजिल्हा बदलीमध्ये व्ही.जे.एन.टी आणि एन.टी.डी. प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या नियमापेक्षा प्रचंड मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. या सर्व बाबी अत्यंत गंभीर आहेत त्यामुळे बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात बैठक घेण्याची विनंती महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्याकडे केली होती. त्यावर ना.अजित दादा पवार यांनी मंत्रालयात याविषयी विशेष बैठक घेतली. बीड जिल्ह्यातील महसूल, पोलिस, जिल्हा परिषद, शिक्षण विभागात नोकर भरती व बदली करताना मागच्याअनेक वर्षापासून बिंदुनामावलीचे पालन करण्यात आलेले नसल्याने त्याचा फटका खुल्या, ओबीसी, एससी, एसटी प्रवर्गातील उमेदवारांना बसला आहे.

## केज पोलीस ठाण्यासमोर ऊसतोड मजुराचा जीवन संपविण्याचा प्रयत्न



केज : ऊसतोड मजुराने केज पोलीस ठाण्यासमोर अंगावर पेट्र ोल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न आज (दि.२६) केला. मात्र, हा प्रकार लक्षात येताच अत्यंत चपळाईने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील जोला येथील पुष्पा मोहन ढाकणे आणि त्यांचे पती मोहन ढाकणे यांच्याकडे ट्रॅक्टर असून ते साखर कारखान्यावर ऊसतोडणी करून कुटुंबाची उपजीविका करतात. त्यांना तीन ऊसतोड मजूर देतो असे सांगून बाजीराव ढाकणे (रा. जोला, ता. केज) याने पुष्पा व मोहन ढाकणे यांच्याकडून १ लाख ४० हजार घेतले. मात्र त्या बदल्यात त्याने मजूर दिले नसल्याने ढाकणे पती-पत्नीने त्याच्याकडे पैशाची मागणी केली असता त्याने पैसे परत दिले नाहीत. त्यामुळे आज सकाळी १०.३० च्या सुमारास पुष्पा व मोहन ढाकणे पोलीस ठाण्याच्या आवारात आले. त्यानंतर मोहन यांने पेट्रोल अंगावर ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे पोलीस ठाण्याच्या परिसरात

## खा.सोनवणेंनी बीड आकाशवाणीची दैना घातली केंद्रीय मंत्र्यांच्या कानी

बीड : बीड आकाशवाणी केंद्राला (१००.२ मेगाहर्ट्झ)अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मराठवाडा जनता विकास परिषद, अंबाजोगाई शाखेचे अध्यक्ष नरेंद्र काळे यांनी समस्यांसदर्भात निवेदन दिले होते. याबाबत माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांची दि.२६ रोजी भेट घेऊन आकाशवाणीची दैना कानी घालत याठिकाणी कायमस्वरूपी अधिकारी नियुक्त करण्याची मागणी केली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन दिले असून यात आवश्यक प्रशासकीय आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे या प्रसारण केंद्राला गंभीर कामकाजाच्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे, असे म्हटले आहे. दरम्यान, याठिकाणी केंद्रात कायमस्वरूपी प्रशासकीय अधिकारी नाहीत. कार्यक्रम अधिकारी आणि प्रसारण कर्मचारी नसल्यामुळे सुरळीत कामकाजात अडथळा निर्माण झाला आहे. देखभाल आणि कामकाजासाठी जबाबदार असलेला कोणताही अधिकारी नाही. या कमतरतांमुळे, केंद्र जवळजवळ निष्क्रिय आहे.

# बसमध्ये पैसे चोरणाऱ्या चार महिला ताब्यात

केज : अहमदपूरहून छत्रपती संभाजीनगरकडे निघालेल्या बसमध्ये एका वृद्धाचे १० हजार रुपये बॅगमधून चार अनोळखी महिलांनी काढून घेतले. हे लक्षात येताच बसमधील प्रवाशांना संशय आला. त्यामुळे बस केज येथील बसस्थानकात घेऊन न जाता चालक व वाहक बस थेट पोलीस ठाण्यात घेवून आले.त्यानंतर प्रवाशांनी या चार महिलांना पोलिसांच्या ताब्यात दिले. या बाबतची माहिती अशी की, दि. २६ मार्च रोजी दुपारी १२:४५ वाजण्याच्या सुमारास अहमदपूर आगाराची बस



अहमदपूर-छत्रपती संभाजीनगर ही बस बुधवारी दुपारी अहमदपूरहून छत्रपती संभाजी नगरकडे निघाली. अंबाजोगाई येथून प्रवासी घेऊन केजकडे येणाऱ्या या बसमध्ये होळ येथून वृद्ध नागरिक नरहरी घुगे हे केजला न्यायालयीन कामासाठी येत होते. बसमध्ये अगोदर असलेल्या चार महिलांपैकी दोन महिलांनी त्यांना त्यांच्या शेजारी जागा दिली. सीटवर दाटी करून त्या महिलांनी त्यांच्या बॅग मधील १० हजार रुपये काढून घेतले. बस चंदनसावरगाव जवळ आल्या नंतर घुगे यांना त्यांच्या बॅगमधील १० हजाराची रक्कम चोरीला गेल्याचे दिसून आल्याने त्यांनी आरडा ओरडा करीत महिलांकडे विचारपूस केली. त्यानंतर या महिलांनी ही रक्कम सीटखाली टाकली. त्यानंतर बसच्या वाहक-चालकांनी बस येथील बस स्थानकात न थांबवता थेट केज पोलीस ठाण्यात आणली. त्यामुळे त्या चार संशयित महिलांना पळून जाण्याची संधी मिळाली नाही. केज पोलीस ठाण्यात बस आणून चार महिलांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. नरहरी घुगे यांनी चार महिलां विरुद्ध पोलिसांकडे तक्रार अर्ज दिला आहे. पोलिसांनी कसून चौकशी केल्यास पैसे आणि दागिने चोरीच्या अनेक घटना उघडकीस येण्याची शक्यता आह

# मराठा आणि कुणबी विद्यार्थ्यांसाठी जिल्हा स्तरावर वसतीगृह सुरु करा

मुंबई । प्रतिनिधी मराठा आरक्षण आंदोलनात सरकारने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मराठा आणि कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. सारथीकडून या बाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली मात्र उच्च शिक्षण विभाग आणि नियोजन विभागातील विसंवादामुळे छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतीगृह स्थापन करण्यास विलंब होत असून शासनाने या बाबत सुधारीत शासन निर्णय करून मराठा व कुणबी विद्यार्थ्यांसाठी



जिल्हास्तरावर वसतीगृह सुरु करावेत अशी मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली आहे. गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ.विजयसिंह पंडित यांनी मराठा व कुणबी विद्यार्थ्यांसाठी राज्यभरातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतीगृह सुरु करण्याची मागणी विधानसभेत केली. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) यांचेकडून जिल्हास्तरावर वसतीगृह सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला. मात्र प्रत्यक्षात जिल्ह्याच्या ठिकाणी अद्याप मराठा विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा मिळत नाही. सारथीच्या व्यवस्थापकीय संचालकांनी या बाबत सविस्तर पत्र लिहून शासन निर्णयात सुधारणा करण्याची मागणी शासनाकडे केली आहे. परंतु त्याची दखल प्रशासकीय पातळीवर घेतली नसल्यामुळे याप्रकरणी विलंब होत आहे. हाच मुद्दा आ.विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत उपस्थित केला. या बाबत बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, शासनाच्या विविध योजनेत ज्या विभागाकडून वसतीगृहे चालविली जातात त्याच विभागाकडून लाभार्थी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर निर्वाह भत्त्यासह इतर निधी जमा केला जातो. आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग यांसह इतर विभागांमध्ये ही पध्दत अवलंबविली जाते मात्र सारथीकडून चालविल्या जाणाऱ्या वसतीगृहासाठी लाभार्थी विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून दिला जावा अशी तरतुद शासन निर्णयात केली आहे. वसतीगृह चालविणारा विभाग आणि निर्वाह भत्ता अदा करणारा विभाग वेगवेगळा असल्यामुळे प्रशासकीय दृष्टीने ही बाब गैरसोयीची ठरत आहे. त्याचबरोबर जिल्हाधिकाऱ्यांनी ठरवून दिलेले शुल्क विद्यार्थ्यांनी वसतीगृह चालविणाऱ्या संस्थेला देण्याची तरतुद असली तरी ही रक्कम विद्यार्थी संस्था चालकांना देतील याची हमी संस्था चालकांना वाटत नसल्यामुळे वसतीगृह सुरु करण्यास अडचण येत आहे. पुढे बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, दि.०९.११.२०२३ रोजीच्या शासन निर्णयात दुरुस्ती करून सारथीकडू न चालविण्यात येणाऱ्या वसतीगृहासाठी संस्था चालक आणि विद्यार्थी यांना द्यावयाच्या अनुदान व इतर निधी देण्यासाठी पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सारथीच्या संचालक मंडळातील सदस्यांनी अनेक जिल्हाधिकाऱ्यांशी या बाबत चर्चा करून तसा अहवाल शासनाला सादर केला आहे. या मधील त्रुटी दूर करून शासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि नियोजन विभाग यांच्यातील विसंवाद दूर करून मराठा व कुणबी विद्यार्थ्यांसाठी राज्यभरातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतीगृहाची सुविधा विनाविलंब सुरु करावी अशी मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी केली आहे. याप्रकरणी आ.विजयसिंह पंडित हे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांची भेट घेवून त्यांना या बाबतचे निवेदन देणार आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com